पुरोगामी विचाराचे
एकमत
page_3
19 Jan 2025

# शाहू महाविद्यालयास स्मार्ट सायबर क्लब पुरस्कार प्रदान



लातूर : प्रतिनिधी

येथील राजर्षी शाहू महाविद्यालया महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते स्मार्ट सायबर क्लब पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आजकालच्या वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी येथील राजर्षी शाहू महाविद्यालय आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर व त्याचबरोबर धाराशिव, सोलापूर, परभणी या जिल्ह्यामधील शाळा, कॉलेज व समाजातील अनेक घटकातील लोकांसाठी राबविण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बी. एस्सी. सी.एस. च्या एकुण ४० विद्यार्थ्यांनी सायबर योद्धा व तसेच प्रा. ज्योती माशाळकर व प्रा. जयश्री जटाळ यांनी समन्वयक म्हणून काम केले.

या उपक्रमांतर्गत एकुण १९० शाळा व महाविद्यालये तसेच विविध शासकीय कार्यालये, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा न्यायालये, बँका, साखर कारखाने, इत्यादी ठिकाणी जाऊन सत्तर हजारापेक्षा जास्त लोकांना वेगवेगळे सायबर फ्रॉडस कसे घडतात, त्यापासून सावधगिरी कशी बाळगायची व सायबर सेलचा हेल्पलाईन नंबर याबद्दल माहिती दिली. त्यांनी केलेल्या या उत्कृष्ट कार्यासाठी महाविद्यालयाला क्विक हिल फॉउंडेशनचा स्मार्ट सायबर क्लब रनर अप -१ व तसेच बी. एस्सी. सी. एस. तृतीय वर्षातील प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला बेस्ट सेक्रेटरी रनर अप -१ हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुणे येथे आयोजित अवॉर्ड सेरेमनी २०२५ मध्ये प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी संजय शिंत्रे, डीआयजी, महाराष्ट्र सायबर सेल व क्विक हिल फाऊंडेशनचे अध्यक्ष अनुपमा काटकर उपस्थित होते. या यशाबद्दल शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पंढरीनाथ देशमुख, सचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. अभिजित यादव, विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतक केले.